**नियमीत दिवाणी दावा क्र.१४३१/२०२२**
**मधील नि.५ वरील आदेश**
**संगिता वि. कल्पना व इतर**
CNR No. MHBI160022132022

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १, २ अन्वये प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व ७ ते ९ यांचे विरूध्द दाखल केला आहे.

२. **वादीचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की,**

अर्जातील परिच्छेद क्र.१ मधील नमूद गट नं.८८, ८९, या शेत मिळकती मौजे आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथील आहेत. सदर मिळकती या प्रस्तुत अर्जातील वादग्रस्त मिळकती असून यापुढे सदर मिळकतीस वादग्रस्त मिळकती असे संबोधले आहे.

३. वादीचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ हे आपापसात बहिण भाऊ असुन ते प्रतिवादी क्र. ६ व मयत दशरथ यांचे आपत्य आहेत. प्रतिवादी क्र. ६ हि मयत दशरथ याची पत्नी आहे. प्रतिवादी क्र. १ हि प्रतिवादी क्र. २ ची पत्नी आहे. तर प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे वादग्रस्त मिळकतीचे खरेदीदार आहेत.

४. वादग्रस्त मिळकती ह्या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून त्यांचे अद्याप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना प्रतिवादी क्र.१ हि वादग्रस्त मिळकतीस तिच्या नावाची नोंद असल्याचा

गैरफायदा घेवुन वादीचा वादग्रस्त मिळकती मधील हक्क डावलण्याच्या हेतुने विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीकडे वादग्रस्त मिळकतीच्या वाटपाची मागणी केली असता प्रतिवादींनी नकार दिला. करीता, वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. पुढे दाव प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ने वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना दिनांक ०७/१२/२०२२ रोजी विक्री केली आहे. त्या आधारे प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे वादीचे दावा मिळकतीवरील सामुहिक वहिवाटीस हरकत अडथळा करुन वादग्रस्त मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. करिता वादीने प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ यांनी वादग्रस्त मिळकतीमध्ये कोणत्याही मार्गाने त्रयस्थ व्यक्तीचा हक्क हितसंबंध निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद दाव्याच्या अंतिम निकालापावेतो देण्याची विनंती केली आहे.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकतीत तिचा अविभाजीत हिस्सा आहे. वादीस प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल तिच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ यांनी वादग्रस्त मिळकतीत त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण केल्यास वादीस त्यांचे वादग्रस्त मिळकती मधील हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर, वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. करिता वादीने तिचा अर्ज मंजुर होण्यास प्राथिले आहे.

६. प्रतिवादी क्र.१ व ७ यांनी प्रस्तुत अर्जास वेळेत म्हणणे सादर न केल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व ७ चे म्हणणे विना चालविण्यात आला आहे. तर प्रतिवादी क्र.८ व ९ यांना समन्स बजावणी होवुनही तो न्यायालयात हजर राहिला नाही. त्यामुळे

प्रस्तुतचा अर्ज त्याचे विरुध्द एकतर्फा चालवण्यात आला.

७. वरीलप्रमाणे वादीचा अर्ज, अभिलेखावरील दाखल कागदपत्रे पाहता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस तिचे बाजूने असल्याचे शाबीत करते काय ? | होय. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ३ | न्यायाचा तोल तिच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करते काय? | होय. |
| ४ | काय आदेश? | अर्ज मंजूर. |

**:: <u>कारणमिमांसा</u> ::**

८. वादीने अर्जाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दावा मिळकतींचे ८अ उतारे, ७/१२ उतारे, फेरफार नोंद उतारा व खरेदी खताच्या प्रती दाखल केले आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३</u>**–

९. मुद्दा क्र.१ ते ३ चे अनुषंगे प्रस्तुतचा ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादीने तिची प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय, हे पाहणे गरजेचे आहे. त्या अनुषंगे अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रतिवादी विरुध्द सदरचा

दावा वादग्रस्त मिळकतीचे वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकती या एकत्र कुटूंबाच्या वडीलोपार्जित मिळकती असून सदरील मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ ने वादग्रस्त मिळकतीस असणाऱ्या तिच्या नावाचे नोंदीआधारे वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना विक्री केली आहे. तसेच, प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे वादग्रस्त मिळकत पुन्हा विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

१०. वादीने तिचे सदरचे कथनाचे पुष्टर्थ अभिलेखावर वादग्रस्त मिळकतीचे सातबारा उतारे व खरेदीखताच्या प्रति दाखल केले आहेत. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १, ७ ते ९ यांनी न्यायालयात हजर राहून सदरची वादीची कथने नाकारलेली नाहीत अथवा वादग्रस्त मिळकती या वादीचे एकत्र कुटुंबाचे वडीलोपार्जित मिळकती नसल्याचे कथन देखील केलेले नाही. तसेच, अभिलेखावर दाखल दिनांक १९/०५/२०११ रोजीचे व दि. ०७/१२/२०२२ रोजीचे खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीचे कुटुंबाचा मुळ पुरूष दशरथ याने वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. १ हिस खरेदी दिली असून पुढे प्रतिवादी क्र. १ ने सदर मिळकत प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना विक्री केली आहे. प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे त्रयस्त इसम असुन ते वादीचे कुटुंबातील सदस्य नाहीत. परिणामी, वादीने शपथेवर केलेली कथनात सत्यता दिसुन येत असुन वादीची कथने आहे तशी स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते.

११. एकंदरीत मुद्दा क्र.१ ते ३ च्या अनुषंगे अभिलेखावर उपलब्ध पुरावा व

दाखल कागदपत्रे विशेषत: वादग्रस्त मिळकतीचे ७/१२ उतारे यावरून वादग्रस्त मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असून त्यामध्ये वादीचा अविभाज्य हिस्सा आहे. सदर कथने प्रतिवादींनी नाकारलेले नाही. अशा परिस्थितीत जर प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ विरूध्द तात्पुरता मनाई आदेश दिला नाही, तर प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ हे वादग्रस्त मिळकतीची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ यांनी वादग्रस्त मिळकतींचे हस्तांतरण केले, तर दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होवून दाव्याची अनेकता होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदरची बाब टाळण्याकरीता प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ यांचे विरूध्द मनाई आदेश पारीत करणे गरजेचे आहे. परिणामी वादीने तिस प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल तिच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. जर प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ विरूध्द मनाई आदेश दिला नाही, तर वादीचे वादग्रस्त मिळकतीवरील हक्कास गदा निर्माण होवून वादीचे नुकसान होणार आहे. याउलट मनाई आदेश दिल्यास प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ चे वादग्रस्त मिळकती मधील हक्कावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. परिणामी प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ चे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी मुद्दा क्र. १ ते ३ उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** –

१२. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत वर नमूद चर्चेवरुन वादीने वादग्रस्त मिळकती संदर्भात तुर्तातुर्त ताकिदीसाठी लागणाऱ्या बाबी म्हणजेच प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तोल व अपरिमित नुकसान प्रथमदर्शनी त्याचे बाजूने असल्याचे शाबीत केले आहे. परिणामी,

वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, गहाण, दान, तारण, कर्जबोजा निर्माण करुन त्रयस्त ईसमांचा हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादी क्र.१, ७ ते ९ विरुध्द देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहिल.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2025.11.28 17:21:03 +0530

(**अ.सं. जगताप**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शिरूरकासार.

दिनांक २८/११/२०२५